**शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे**

**शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.**

दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

**सूचना**

**केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना**

विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की **केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०१९-२०** नुसार **मुस्लिम, खिश्चन, शीख, बौध्द, जैन व पारशी** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता ही योजना राबविण्यात येते. यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत,** याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यास मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Course/tuition fee and maintenance allowance) केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्याच्या बँक खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

**किमान पात्रता व अटी :**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा
३) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.
४) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५०% गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमास शिकत असणे आवश्यक आहे.
६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती नियमित असणे आवश्यक आहे.

**अर्जासोबतची आवश्यक कागदपत्रे :**

१. विद्यार्थ्याचा फोटो
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत. (Self Attested )
३. महाविद्यालयाने पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification Form)
४. पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
५. अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वतः प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र. १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.
६. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.
७. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत. विद्यार्थ्याला मंजुर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बँक खात्यावरच जमा करण्यात येणार आहे.
८. रहिवासी प्रमाणपत्र.(Residential/Domicile certificate)
९. आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.
१०. रेशन कार्ड, शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Attested copy of Ration Card & Leaving Certificate)

**अर्ज करण्याची पद्धत** (नविन मंजुरी/नुतनीकरण) :

(१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

(२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

(३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

(४) विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यन्त विद्यार्थ्याने नुतनीकरणासाठीच अर्ज भरावा.

(५) ऑनलाईन अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालयामध्ये पुढील कार्यवाहीसाठी **३१/१०/२०१९ पर्यंत नवीन शिष्यवृत्ती करिता (Fresh) व नुतनीकरण शिष्यवृत्तीकरिता (Renewal)** सादर करावीत.

**टीप :** विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत श्री. डी.एन्. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

प्रभारी प्राचार्या